मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

follow us : /rajdandlive

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 ✻ वर्ष २६ ✻ अंक ३४६ ✻ मंगळवार दि.१७ सप्टेंबर २०२४ ✻ पाने ४ ✻ किंमत ५/-



छाया : अतुल देशपांडे

# पुढच्या वर्षी लवकर या........



## विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ

**सातारा :** सालाबादप्रमाणे अनंत चतुर्दशीच्या अगोदर एकच दिवस सातारा शहरातील अनेक मान्यवर मंडळांनी वाहतुकीला अडथळा नको तसेच अनंत चतुर्दशी दिवशी होणारी रस्त्यातील गर्दी कमी करण्यासाठी आपल्या मंडळाच्या गणेश मूर्तीला सोमवारी सायंकाळीच विसर्जन मिरवणूक काढून निरोप दिला.

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.. जयघोषात या मिरवणुकीला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. सातारा शहरातील मानाचे शेटे चौकातील प्रकाश मंडळ यांच्या शंकर-पार्वती गणेशाची मिरवणूक निघाली. पुणे येथील राजकमल ब्रास बँड पथक तसेच रंगावली रांगोळी कलाकारांनी चौकाचौकात काढलेल्या रांगोळ्या विशेष लक्षवेधक ठरक होत्या त्यानंतर शहरातील मंडईचा राजा मंडळाची निघालेली मिरवणूक ही भव्य दिव्य अशी होती राजहंस ढोल व ताशा पथकाच्या कलाकारांनी केलेले ढोल व ताशांचे वादन सर्वसाधारण चे लक्ष वेधून घेणारे होते,माची पेठेतील बालस्फूर्ती मंडळ, यादव गोपाळ पेठेतील अजिंक्यतारा गणेश मंडळ केसरकर पेठेतील मयूर सोशल क्लब, पोवई नाका परिसरातील प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या कर्मचाऱ्यांनी बसवलेल्या गणेशाची मिरवणूक निघाली. त्याचप्रमाणे सातारा जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या बाल हनुमान गणेश मंडळाची मिरवणूकही पोलिसांनी साध्या वेशात अगदी धोतर, शर्ट, डोक्यावर टोपी घालून मोरयाच्या जयघोषात काढली.

सातारा शहरातील विसर्जन मिरवणुकी निमित्त अनेक मुख्य रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले असून या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे सातारा जिल्हा पोलीस दलाचे मुख्य जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख व मान्यवर पदाधिकारी या मिरवणुकीच्यासाठी विशेष परिश्रम घेत असून ठीक ठिकाणी सीसी कॅमेरे पोलिसांचे गस्त पथक होमगार्ड आदी विशेष परिश्रम घेत आहेत अनंत चतुर्दशी दिवशी सकाळी मानाचा सम्राट महागणपती पंचमुखी मंडळ तसेच मोती चौकातील प्रतापसिंह गणेश मंडळाची मिरवणूक सुरू होईल.

सायंकाळी पाच वाजता राजवाडा येथून सातारा नगरपालिकेच्या मध्यवर्ती गणेश मंडळाच्या मूर्तीचे आरती व पूजन होऊन मुख्य मिरवणुकीला सुरुवात होईल यानिमित्त विविध ठिकाणी विसर्जन हौद तसेच विसर्जन तळी उभारण्यात आली असून राधिका परिसरातील मुख्य विसर्जन तयार मोठी महाकाय क्रेन मोठे गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी तैनात करण्यात आली आहे विशेष विद्युत रोषणाईचा झोतामध्ये दिवस-रात्र हे विसर्जन तसेच त्यासाठी खास मर्चंट व्यवस्थाही करण्यात आली आहे पालिकेच्या वतीने मूर्तींचे विसर्जनासाठी विशेष कर्मचारी पथक तैनात करण्यात आले आहे.

साताराचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले तसेच सातारा व जावली तालुक्याचे विद्यमान आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे वतीने तसेच सकल मराठा समाज संघाचे वतीने ही कन्या शाळा येथे या विसर्जन मिरवणुकीमध्ये विशेष स्वागत कक्ष उभारण्यात आले असून विविध मंडळांच्या मान्यवरांचे यावेळी या विसर्जन मिरवणूक सोहळ्यात स्वागत करण्यात येणार आहे पोलिसांनी डीजे तसेच लेझर लाईट ला बंदी घातली असून रात्री बारापर्यंत मिरवणुकांना वाद्य वाजवण्यास परवानगी देण्यात आली आहे.

## राज्यातील सर्व शाळा २५ सप्टेंबर रोजी बंद राहणार

**पुणे :** एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्यातील शिक्षक संघटना आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी शासनाच्या निर्णयाविरोधात आक्रमक झाल्या आहेत. शिक्षक संचमान्यतेचा १५ मार्च २०२४ चा आणि कंत्राटी शिक्षक भरतीचा ५ सप्टेंबर २०२४ चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा २५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला. यामुळे राज्यातील सर्व शाळा २५ सप्टेंबर रोजी बंद राहणार आहेत.

राज्यात सुधारीत शिक्षक संच मान्यता आणि कंत्राटी शिक्षक भरतीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. याला राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी कडाडून विरोध केलाय. ही अंमलबजावणी सुरू झाल्यास राज्याच्या ग्रामीण भागातील १ लाख ८५ हजार विद्यार्थी आणि २९ हजाराहून अधिक शिक्षकांचे भवितव्य अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

नवीन धोरणानुसार २० किंवा त्यापेक्षा कमी पट असलेल्या शाळांवर केवळ एकच कायम शिक्षक दिला जाणार असून त्यासोबत सेवानिवृत्त शिक्षकाची कंत्राटी पदधतीने नेमणूक केली जाणार आहे. येत्या २५ सप्टेंबर रोजी सर्व प्राथमिक शाळांचे शिक्षक सामुहिक रजा आंदोलन करीत प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

## काँग्रेसच आरक्षणाची खरी मारेकरी

### चंद्रशेखर बावनकुळे यांचा आरोप

**मुंबई :** काँग्रेसच्या पोटात आरक्षणाबाबत जे मत आहे तेच त्यांचे नेते राहुल गांधी यांच्या ओठावर आले आहे. काँग्रेस हीच आरक्षणाची खरी मारेकरी आहे, असा आरोप भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

योग्य वेळी आरक्षण संपुष्टात आणण्याचा विचार करू. अध्यापची वेळ आलेली नाही, असे विधान लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात केले होते. त्यावरून विरोधककडून गांधी यांना टीकेचे लक्ष केले जात आहे. त्यात शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांची या विषयावर टीका करताना जीभ घसरली आहे. त्यांनी गांधी यांची जीभ छाटणाऱ्याला ११ लाखाचे इनाम जाहीर केले आहे. त्यांच्या या विधानावर बावनकुळे प्रतिक्रिया व्यक्त करीत होते.

गायकवाड यांच्या या विधाने भाजप व समर्थन करीत नाही, असे सांगत बावनकुळे यांनी हात वर केले. मात्र, राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून काँग्रेसच्या पोटातील मळमळ बाहेर पडली आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी संविधान बदलणार अशी अवयव उठवणाऱ्या काँग्रेसचे खरे रूप उघड झाले आहे, अशी टीकाही बावनकुळे यांनी केली.

## गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाची डागडुजी

**कोल्हापूर :** सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीची कोल्हापूर महापालिकेच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. विसर्जन मार्गावर पॅचवर्क करण्यात आले आहे. शिवाय गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी ४ विभागांमध्ये २२ कृत्रिम कुंड ठेवण्यात आले आहे. तसेच धोकादायक इमारतींचे पत्रा पार्टिशन व बॅरिकेटिंग करून सुरक्षित करण्यात आले आहे.



खड्डेमय कोल्हापूर अशी ओळख बनलेल्या कोल्हापुरातील रस्त्यांना सार्वजनिक गणेश विसर्जन मिरवणुकीमुळे तात्पुरती डागडुजी करण्यात आली आहे. खड्ड्यामुळे गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणताही अडथळा होऊ नये यासाठी विसर्जन मार्गावर म्हणजेच महाद्वार रोड,पापाची तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, न्यू महाद्वार रोड यासह अन्य मिरवणूक मार्गांवर डांबरीकरण करून खड्डे मुजविण्यात आले आहेत. धोकादायक ८ इमारतींचे पत्रा पार्टिशन व बॅरिकेटिंग करण्यात आले आहे. तसेच पाणी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी गणेश मूर्ती विसर्जनासाठी २२ ठिकाणी कृत्रिम कुंड ठेवण्यात आले आहेत. तसेच कोल्हापूर महापालिकेच्या वतीने मूर्तीदान चे आव्हान देखील करण्यात आले आहे.

## वनराज आंदेकर खून प्रकरणातील २१ आरोपींवर मोक्का कारवाई

**पुणे :** माजी नगरसेवक वनराज सूर्यकांत आंदेकर (वय ४०) यांच्या खूनप्रकरणातील तब्बल २१ आरोपींवर पुणे पोलिसांनी मोक्कानुसार (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा) कारवाई केली आहे. सोमा गायकवाड टोळीचा म्होरक्या असून, यामध्ये तीन अल्पवयीन मुलांसह वनराज यांच्या बहिणीचा आणि तिच्या पतीचा समावेश आहे.

टोळी प्रमुख कुख्यात गुन्हेगार सोमा ऊर्फ सोमनाथ सयाजी गायकवाड (रा. आंबेगाव पठार) तसेच संजीवनी जयंत कोमकर (रा. ३०९, नाना पेठ) जयंत लक्ष्मण कोमकर (वय ५२), भाचा प्रकाश जयंत कोमकर, गणेश लक्ष्मण कोमकर (३७), अनिकेत दूधभाते, तुषार उर्फ आबा कदम, सागर पवार, सॅम ऊर्फ समीर काळे, आकाश म्हस्के, संगम वाघमारे यांच्यासह १८ जणांना अटक तर, तीन अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले. समर्थ पोलिसांत वनराज यांचे वडील सूर्यकांत ऊर्फ बंडू राणूजी आंदेकर (वय ६८) यांनी तक्रार दिली आहे.

वनराज आणि संजीवनी बहिण भाऊ आहेत. जयंत कोमकर हा संजीवनी हिचा पती आहे. तर गणेश कोमकरचे आंदेकरच्या सर्वात धाकट्या मुलीशी लग्न झालेले आहे. वनराजचे सख्खे मेव्हणे आहेत. तर, प्रकाश हा सख्खा भाचा आहे. त्यांच्यात आर्थिक वाद होते. घटनेच्या दोन दिवस आधीच संजीवनी यांच्या दुकानावर अतिक्रमणबाबत कारवाई झाली होती. कारवाई वनराज यांच्या सांगण्यावरून केल्याचा संशय संजीवनीला होता. त्याचा राग त्यांच्या मनात धरून १ सप्टेंबर रोजी वनराज हे घराजवळ चुलत भाऊ शिवम याच्यासोबत उभारले असताना त्यांच्यावर गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून खून केला होता. यानंतर पोलिसांनी एकूण १८ जणांना अटक केली. तर, ८ पिस्तूल तसेच १३ जिवंत काडतूसे, मोटार आणि ७ दुचाकी जप्त केल्या आहेत.

## मराठ्यांना आरक्षण न मिळाल्यास त्याला फडणवीस जबाबदार : जरांगे पाटील यांचा इशारा

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आपण पुन्हा उपोषण सुरू करणार असून हे आंदोलन ही राज्य सरकारला शेवटची संधी असेल. यावेळी देखील मराठा समाजाला आरक्षण न मिळाल्यास त्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे.


मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून आरक्षण मिळावे, आरक्षणात सगेसोयऱ्यांचा समावेश व्हावा, हैदराबादसह तीन गॅझेट प्रमाण मानावे, या प्रमुख मागण्यांसाठी जरांगे पाटील आज रात्री बारा वाजल्यापासून पुन्हा उपोषण सुरू करणार आहेत. त्यापूर्वी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य सरकारला अनेक इशारे दिले.

**यापुढे करणार नाही राजकीय भाष्य**

आपण पुन्हा उपोषण सुरू करणार असून केवळ मराठा समाजाला आरक्षण मिळावे हीच आपली मागणी आहे. आपल्याला राजकारण करण्यात कोणताही रस नाही. मात्र, आम्ही राजकारण करू नये अशी इच्छा असेल तर आमच्या मागण्या मान्य कराव्या. आम्हाला निवडणुकीची काही देणे घेणे नाही. त्यामुळे इथून पुढे आपण कोणतेही राजकीय भाष्य करणार नाही, असेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

**धनगर समाजाच्या मागणीला पाठिंबा**

धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये भावा, या मागणीसाठी पंढरपूर येथे उपोषण सुरू आहे. या आंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकारने धनगर, धनगड, धनखड एकच असल्याचा शासकीय आदेश काढण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे जरांगे पाटील यांनी स्वागत केले आहे. धनगर समाजाच्या या मागणीला मराठा समाजाने पाठिंबा द्यावा, असे आवाहनही जरांगे पाटील यांनी केले आहे. ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ हे दंगली घडविण्याच्या विचारात असून त्यांच्याशी भांडण ओढवून घेऊ नका, असा सल्लाही त्यांनी धनगर समाजाच्या नेत्यांना दिला आहे.










(सातारा शहरात सोमवारी निघालेल्या मंडईचा राजा गणेश मंडळाच्या भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये राजहंस ढोल व ताशा पथकाच्या वादनाने सातारकरांना मंत्रमुग्ध केले. सातारा शहरातील प्रकाश मंडळ शेटे चौक यांची शंकर पार्वती गणेशाची भव्य मिरवणूक राजकमल पुणे ब्रास बँडचे पथक आणि पुणे येथील रंगावली संस्थेचे कलाकार महा रांगोळ्या रेखाटताना (सर्व फोटो ...अतुल देशपांडे : सातारा.)

# नटसम्राट व नौटंकी नेत्यांचा तमाशा

**शेती आणि शेतकरी हा प्रश्न मुळातच केंद्रातील आहे. हे प्रश्न राज्याला फक्त धरून असतात. नुसतं एका राज्यापुरते मर्यादित नाहीत. आर्थिक धोरणे, केंद्रातील कायदे ही बाब शेतकऱ्यांसाठी फसवणुकीची आहेत ,हे आता सर्वश्रूत झाले आहे. तरी आपण शेतकरी व शेतीचा प्रश्न हा ग्रामपंचायतच्या निवडणुकी पासून तर आमदारकीच्या निवडणुकीपर्यंत रेटतो. तो फक्त बोलण्याचा भात व बोलण्याची कढी एवढाच आता मर्यादित राहिलेला आहे. तर तो प्रश्न शेतकऱ्यांची मजा घेण्यासाठी,असून तो प्रश्न सोडवण्यासाठी नाही. राज्याच्या भरोशावर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटूच शकत नाही. या सर्व शेतकरी नेत्यांना एकत्र यायचे होते तर केंद्रातील निवडणूक लोकसभेची असताना ही शेतकरी नेते मंडळी एकत्र आघाडी का करू शकली नाही. त्यावेळेस ही शेतकरी नेते कुठे झोपली होती. ती तर याला पाढा त्याला निवडून आणा या मोठेपणात व शहाणपणात गुंतली होती. म्हणजे यांचं अस्तित्वच पाडण्यात आणि निवडून आणण्यात होते हे जनतेला यांनी दाखवून दिले.**

शेतकऱ्याच्या नावावर स्वार्थाच्या दुकानदारी उघडून बोंबाट करण्याचा धंदा महाराष्ट्रात सुरू झालेला आहे. शेतकरी प्रश्न जर सोडवायचे असेल तर खरोखर केंद्रात लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेस तिसरी आघाडी होऊन काँग्रेस - बीजेपी ला शह देणे गरजेचे होते. तेव्हा राज्यातील पक्ष का झोपी जातात.? शेतकरी लढा हा देशपातळीवर आहे . विधानसभेच्या निवडणुकी अगोदर शेतकऱ्यांसाठी तिसरी आघाडी एकत्र येणे गरजेची होती.पण आता विधानसभेच्या वेळेस, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ही सुद्धा शेतकरी नेते मंडळी एकत्र राहील की नाही? याची खात्री कोण देणार आहे?

युती आणि म.वी.आघाडीत बसून आणखी जनतेला खेळवणे यापेक्षा दुसरे काही निघणार नाही. कारण युती व महाविकास आघाडीने (काँग्रेस व बीजेपी या राजकीय पक्षाने)शेतकऱ्यांचे प्रश्न आजपर्यंत ७५ वर्षात सोडविले नाही. तर शेतकऱ्यांच्या आत्महत्याच घडविल्या हे सर्वश्रुत आहे.

जसे की झाडाला फुटवे येतात, तसेच शेतकऱ्यांचे नाव घेऊन शेतकरी मंडळ तयार झालीत. हे फुटवे ना झाडाला वाढू देत नाही , ना शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य देण्याची व वाढविण्याची या फुटव्यामध्ये ताकद आहे. नुसतं झाडावरून उड्या मारणारे बंदरे तयार झालीत, व शासनाची तिजोरी लुटणारी एक जमात तयार झाली. आम्ही वेळे पुरतं कशामध्येही सामील होतो , कारण काही नेत्यांचा तो पिंड आहे. वेळेनुसार यात्रा व जत्रा काढून शेतकऱ्यांना डुबवण्याचा गोरख धंदा महाराष्ट्रभर सतत वर्षानुवर्षे चालू आहे. बीजेपी सत्तेत असेल तर काँग्रेस आवाज उठविते. आणि काँग्रेस सत्तेत असेल तर शेतकऱ्यांच्या नावाने बीजेपी आवाज उठवते.

संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हेतर देशात या नटसम्राटांचा व नौटंकीचा तमाशा सुरू झालेला आहे. कोणतेही राजकीय पक्षाला शेतकऱ्यांचा प्रश्न मिटवायचा नाही आणि तो सोडवायचा सुद्धा नाही?. कारण तीच तर त्यांच्या निवडणुकीतील खुराक आहे. शेतकऱ्यांच्या नावाने दु:ख गाऊन आमदार- खासदार होण्याची ही फक्त एक संधी आहे. वेळेपुरती आसूड यात्रा काढून रघुनाथ दादा पाटील यांच्यासोबत जाऊन, मोदीच्या विरोधात गुजरात जातो. वेळ मारून नेण्यासाठी अण्णा हजारे सोबत जातो, जो कोणी देशात चमकत असेल त्याच्यासोबत घंटाभर आम्ही जाऊन जरांगे पाटलासारखेची सोबती व सुट्टी करतो. आठवलेच्या रिडालोस मध्ये जाऊन बाहेर पडतो. सौदेबाजी करण्यासाठी व धरणाच्या पाण्यासाठी सरप अंगाले गुंडळतो. कारण आमच्या अंगात चुकीचा शिवाजी घुसलेला आहे.

आम्ही निवडून येण्यासाठी आता तिसऱ्या आघाडीतही जातो आणि तिथूनही तुरी देऊन बाहेर निघतो. आम्ही ज्या पक्षाच्या उमेदवाराला पाडतो आणि त्याच पक्षाशी युतीही आम्हीच वरतून मुंबई- दिल्लीतून करतो. कारण मुळातच तमासखोर आहोत ना? जनतेला च्युवत्या बनवणारी भामटेगिरी, आमच्या नसा नसात भिनलेली आहे. नाशिकच्या मेळाव्यात व आम्ही २०१९ च्या निवडणुकी अगोदर शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी हातात हात उंच करून, शपथ घेतो. आणि नंतर शेतकऱ्यांचा घात करून, सुकाणू समिती फोडून ,काँग्रेस- राष्ट्रवादीच्या कळपात घुसतो. गवई साहेबांच्या निवडणुकीत राहून बौद्ध समाजाचे कैवारी होतो व त्यांनाही डूबवितो.आम्ही सौदेबाजी करून घरावर ,इतराच्या मोर्चे नेतो, ठिय्या आंदोलन करतो, आणि पैसे कमावतो ?.

पण आमच्या नाटकी प्रयोगाला लोकच टाळ्या वाजवतात .लोकांना आम्ही बेवकूफ बनवितो, तरी लोकाना केळ वाटून आमच्या सोबतच ठेवतो. हेमा मालिनी बंपर दारू पिते म्हणतो,मंग हेमामालिनी सिनेमात दारू पिते म्हणून म्हणतो, मग फडणवीसचे आम्ही घरावर बॉम्ब फेकतो,नाही तर मग सुतळी बॉम्ब फेकतो म्हणतो.अन आम्हाले नेट लागला की, आम्ही तिथूनही पयतो व दुसऱ्याच पक्षाचा आधार घेतो. आम्हीच न्यूज चॅनल, न्यूज पेपर्स, युट्युब वर सर्वे खिशात घालून आमच्याच फुशारकीचा व्हिडिओचा प्रचारही करतो. आम्हीच हाऊस मध्ये शेतकऱ्यांचे किती कैवारी आहोत म्हणून दाखवितो,अन् पंधरा मिनिटे भाषणे करून बाहेर येऊन सौदेबाजी करतो? ?आम्हीच भीक मागून मते मागणारे, आज अब्जोपती झालो तर त्यात नवल नाही ना?.

मंत्री होण्यासाठी शिवाजी महाराजांच नाव घेऊन उद्धव ठाकरे सोबत जातो, अपंगाचे नाव घेऊन उद्धवच्या हातावर तुरी देऊन महायुतीत घुसतो. लोकसभा निवडणुकीत भाडोत्री सौदेबाज होऊन ,उमेदवार उभे करतो.आमच्यासारखा सौदेबाज कोणी नाही. व बेईमानाच्या भरतीतला आमच्या इतका इमानदार नेता तर देशातही नाही. नरेंद्र मोदीला उलटा टांगतो अन मग त्यालाच मत देण्यासाठी राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीसाठी, फडणवीस साहेबाच्या इशारावर शेपूट हलवतो. वेळ पडल्यास गुहाटीला जाऊन सौदे करतो, एकनाथ शिंदेचे गुलाम होतो. कारण आमची नाटक कंपनीचा एकपात्री प्रयोग कार्यक्रम जगजाहीर आहे. आम्ही जनतेला बोटाच्या इशारावर नाचवतो ना? आम्हाला कशाची शरम ना, आम्हाला भीती आहे. कारण आम्ही सरकारच्या तिजोरीवरचे नाग बनतो ,सोबत चिल्लर हत्ती पोसतो, व भजे खाऊ घालणाऱ्या कार्यकर्त्यांना सोबत ठेवून फुकटच्या डरकाळी फोडणारेना कमिशन देवून घरे चालवतो व वाटतो ,कारण आमच्या घरून थोडे जाते. शेतकरी - शेतमजूर व कामगारांच्या कष्टाने जमा केलेल्या तिजोरीचे लचके तोडतो. सरकारच्या तिजोरीचे लुटारू, दरोडेखोर व महाचोर बनवून शहानशहा फिरतो. कारण जैलात जरी गेलो तरी तुम्हालाच आम्ही आमच्या गळ्यात हार टाकण्यासाठी बोलावतो.कारण तुमच्यात पाडण्याची हिंमत मतदारांमध्ये नाही. तर तुम्हाला नाचवण्याची ताकद आमच्यात आहे. कारण सरकारच्या मस्तीत आम्ही लुटारू, तिजोरी चोर, व दरोडेखोर बनलेलो आहे. आम्हाला चोरलेल्या पैशाची गरमी आहे ना?

जनता भोळी आहे, मतदारांना समजत नाही म्हणून तर आमच्यासारखे तमासखोर निवडून येतात. अन् जातीच्या भरोशावर आम्हीच निवडूनही येतो, कारण आमची जातच चुकीची एकी दाखविण्यात बेवखुब व तरबेजआहे ना ? लोकांना आमची नौटंकी आवडते, त्याला आम्ही काय करावे.? आम्हीच शासनाला पाठिंबा देऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडवितो आणि आम्हीच शेतकऱ्यांचे नेते, कैवारी म्हणून तहसीलदाराच्या उरावर,कलेक्टरला निवेदन देऊन मोर्चे काढतो. आमच्या दुकानातील माल, किती शिल्लक आहे हे मतदाराना व गावोगावी दाखवतो ?. गावोगावी गाड्या पाठवून लोकांना भजे खाऊ घालतो. कारण आम्ही समाजाचे कैवारी आहोत, कोणालाच आम्ही उपाशी ठेवत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडविला नाही तर आम्हाला कोण विचारेल, आम्हीच मारून टाकतो आणि त्यांचे रक्त पिऊन जगतो. जनतेला बेवकूफ बनवून आम्हीच आमदार - खासदार होऊ शकतो, दुसरा कोणीही होऊ शकत नाही. कारण आम्ही समाजात गोरगरिबांचे अपंगाचे ,राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे व गाडगेबाबांचे फोटो, गळ्यात घालून फिरतो मग आम्ही सेवक आहोत ना ?. कारण तुम्हीच आम्हाला पक्षाचे प्रतिनिधी म्हणून निवडून दिले आहे ना?. तुमचा नेत्यांवर भरोसा होता ना, मग घ्या ना शेकुन. आता तुमची वाट कशी लावायची, ते आमच्याच हातात आहे. कारण आम्ही बॉसचे इशाऱ्यावर नाचणारे लोकप्रतिनिधी आहोत. सतत आम्हीच सत्तेत राहावे, यासाठी आमच्याच बाजूने जसे पाहिजे तसे कायदे बनवून घेत आहोत.आम्ही एक वर्ष वाटणार आहोत,आणि पुढील चार वर्षे तुम्हाला लुटणार आहोत. कारण ही लोकशाहीचं तशी आहे. त्यात आमचा काय दोष. आता कोर्ट कचेरी ह्या आमच्याच खिशात आहेत. निवडणूक आयोग आमच्या खिशात आहे. तुम्ही फक्त कविता ,लेख शेतकरी दु:खाचे पोवाडे म्हणत रहा. घसे कोरडे करू करू गायत रहा. आम्ही तुमच्या सोबत टाळ्या वाजवू लागतो. बेवकूबानी बेवकुवासाठी चालवलेलं राज्य म्हणजेच आजच्या लोकशाहीतील बेबंदशाही. डरकाळ्या फोडणारा शेतकरी आता बायांच्या पाठीमागे लपायला लागला ? पुढे अजून नाटकाचे अंक शिल्लक आहेत.

जनतेला बेवकूफ बनविण्यासाठी पुन्हा तिसरी आघाडी उभी होते आहे. कधीतरी सत्तेतील दहा जणांशी तडजोड व घरठाव करणारा लुच्चा हा, शूरवीर होईल का? आणि शेतकरी विरोधी कायदे तोडून शेतकरी, शेतमजुरांना न्याय देऊ शकेल काय ? असाच बेवकूफ बनवणारा माजी मंत्री जालना लोकसभेचा उमेदवार, हा जनतेनी खाली उतरवून पन्नास वर्षाची राजकीय कारकीर्द संपविली ,ती ही जनता महाराष्ट्रातीलच होती. कारण लोकशाहीत खऱ्या वस्तुस्थितीची माहितीचा करंट हा जनतेत पोहोचण्यासाठी जरा उशीर लागतो. कारण लोकांनीच, लोकांसाठी केलेली फसवणूक म्हणजे लोकशाही. खोट्यांनी खोट्यांसाठी केलेले कायदे म्हणजे तर लोकशाही ना ? खोटे बोला पण रेटून बोला. पक्षाच्या रक्षणासाठी,व स्वत:च्या सुरक्षितते साठी खोटे कायदे करून सत्ता चालविणे अशीच आता लोकशाहीची व्याख्या होत चालली आहे. लोकशाहीतील बेबंदशाही मुळे आता लुटारूचा अड्डा तर तयार होऊन, आमदार - खासदारांच्या ती सोयीची झाली.? सिंहासन हे जनतेच असते, ते तर कोणाच्याच मालकीचे नसते. सिंहासनावरून उतरवुन थोड्या थोड्या चुकी मुळे, कित्तेक मुख्यमंत्री घरी गेलित .तुमची सुद्धा अति तिथे माती करणारी, जनताच असते. हे सुद्धा लक्षात असू द्या.

# दौंडचा सामजिक विकास होण्याऐवजी ठेकेदारांचाच मोठा विकास

**दौंड :** . दौंडला सामाजिक विधायक आणि जन सामनयाचा विकास कमी आणि. राजकीय लाभार्थी सत्तेवरील नेत्यांच्या चमच्यांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. अशी खंत व्यक्त करीत राजकीय जोडे उचलणारे गावातील सांगकामे तरुण तालुक्यात नामवंत ठेकेदार होउन मान्यवरांचे आणि अधिकाऱ्यांचे एजेंट झाले आहेत. अशी घणाघाती टिका दौंड चे जेष्ठ नेते नंदु पवार नाव घेता तालुका नेत्यांवर केलीआहे.

दौंड पंचायत समितीत रावनगाव येथील. जिल्हापरिषदेतील शाळेच्या मुलांनी आम्हाला शिक्षक पाहिजे म्हणुनी आक्रोश केला या प्रसंगाला समजल्यावर पवार पंचायत समितीत आले होते, त्या वेळी त्यांनी. पत्रकारांशी वार्तालाप केला.

नंदु पवार बोलताना पुढे म्हणाले , विशेष विकास नावाचा वारू नेत्यांच्या भक्ती पोटी काही अंध मोजक्याच लाभार्थी सेवेकरी कार्यकर्त्यांनी बळच दामटण्याचे काम केले आहे.

नेत्याला उगाच अमका दुत तमका. दुत. उपमा देउन गळा फाटे पर्यंत नेत्यांची भाटगिरी करीत त्याच्या प्रचाराला लागले आहेत.

विकास कामांच्या रक्कमा हजरोच्या कोटी या निमित्ताने सांगू लागले आहेत. अशी माहिती त्यांनी तालुक्यात विकास कामे आणि त्याचा प्रचार करणाऱ्यांबाबत देऊन ते म्हणाले. लहान मुलांना रावनगावातून येऊन आम्हाला शिक्षक द्या असा टाहो फोडावा लागतो आहे . ही बाब अत्यंत गंभीर आहे. दुत नावाची उपाधी देणाऱ्या त्या भक्तांना आणि पदवी दिलेल्या त्या नेतृत्वला हे दिसणार नाही, भक्त. अंध आहेत आणि अंधना दिसणार नाही हे नक्की तालुक्यात या भक्तांना अनेक सामजिक प्रश्नाचा डोंगर झालेला आहे तसेच भ्रष्ट. कारभाराचा कळस झालेला असून त्यांना याची यादी द्यावी लागणार आहे असे बोलताना त्यांनी , शहरात अनेक वर्ष झाले सार्वजनिक मुतारी बांधता आलेली नाही,शहरात तालुक्याच्या ग्रामीण भागातून अनेक नागरिक येतात त्यात महिलांचा समावेश असतो त्या महिलांना साधी लघवीची सोय केली. नाही, संपूर्ण तालुक्यात पिण्याच्या पाण्याची बोंबाबोंब आहे. आमदार आसलेल्या राहू गावाला महिन्याला जवळपास, ९ लाख रुपयाचे अधिक पाणी विकत घावे लागते, अस ऐक गाव नाही त्याला गेली तीस वर्षे शुद्ध पाणी नळाद्वारे मिळत आहे. खर्च मात्र हजार कोटींच्या पुढे आहे.

विकास कामांच्या रक्कमा पाहून झालेली कामे पाहिल्यास त्यांची गुणवत्ता अत्यंत खराब झालेली आहे, ही कामे करणारी ठेकेदार मंडळी नेत्यांची हुजरेगिरी करून झालेली आहेत, आजही ते स्वत:ला स्वाभिमानी दौंडकर म्हणतात पण त्यांचं जिन पाहता ते लाजिरवाणी जीवन जगत ठेकेदारी करीत आहेत

ज्या तालुक्याला पिण्याचे पाणी नाही शीक्षणाची अवहेलना झालेली आहे गावागावात गटारी नाहीत असा हा तालुका विकासाच्या गप्पा ठोकतो ही अत्यंत भंगार बाबा आहे. तालुक्यातील युवा वर्ग हाताला रोजगार नाही म्हणून त्रस्त झालेला आहे तो कार्यकर्ता बनून उगाच विकास नावाला घेऊन बोंब मारताना दिसत असून या विकासाच्या बोंबाबोंब मध्ये लाचार ठेकेदार आणि अंध भक्तांचा भरणा निर्माण झाला असून विकासाच्या कामाचे पैसे मात्र भ्रष्ट कारभारात वीभागून गेलेले आहेत ठेकेदार झालेला तरुण राजकीय नेत्याचा आणि शासनाच्या अधिकाऱ्यांचे चमचे बनले आहेत, यापेक्षा दुसरे काहीच नाही हा तालुका स्वाभिमानी दौंडकर म्हणून आहे की इथे लाचार दौंड करून म्हनावा लागेल अशा स्वरूपाची अवस्था तालुक्याची वस्तुनिष्ठ परिस्थितीची सत्य पाहणी केल्यास खऱ्या अर्थाने उघड झाल्याशिवाय राहणार नाही.

# कधी काळी रक्ताची होळी खेळणारे उतरणार बस्तर ऑलिंपिकच्या रिंगणात

**रायपूर :** शस्त्र खाली ठेवून आत्मसंर्पण केलेल्या भूतपूर्व नक्षलवाद्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्यात व हिंसाग्रस्त कुटुंबातील युवकांमध्ये असलेली अविश्वासाची दरी कमी करण्यासाठी छत्तीसगड राज्य शासनाच्या वतीने बस्तर ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. कधी काळी रक्ताची होळी खेळलेले शरणागत नक्षलवादी आणि नक्षलग्रस्त भागातील सर्वसामान्य तरुण या खेळांच्या स्पर्धेत एकत्रितपणे उतरणार आहेत.

**मोडले नक्षलवाद्यांचे कंबरडे**

सध्याच्या काळात छत्तीसगडसह नक्षलग्रस्त राज्यातील सुरक्षा यंत्रणांनी नक्षल विरोधी मोहीम प्रभावीपणे राबविली आहे. त्याचप्रमाणे नक्षलग्रस्त भागातील प्रशासनांनीही शिक्षण, आरोग्य आणि अन्य नागरी सुविधा उपलब्ध करून देऊन प्रामुख्याने आदिवासी समाजाला नक्षलवादापासून तोडण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांचे फळ म्हणून नक्षलवाद्यांचा गड समजल्या जाणाऱ्या बस्तरमध्येच नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून बस्तर ऑलिंपिकचे आयोजन करण्यात आले आहे.

**नक्षलवाद्यांच्या भरतीकडे युवकांची पाठ**

साधारणपणे नक्षलवादी टोळ्यांचे प्रमुख बस्तरच्या गावागावात जाऊन गावातील आदिवासी तरुणांची माथी भडकवण्याचे कार्य करतात. प्रस्थापित प्रशासकीय यंत्रणेबाबत त्यांच्या मनात संताप निर्माण करतात. द्वेषाची भावना निर्माण करतात आणि असे माथे भडकलेले तरुण नक्षलवादी टोळ्यांमध्ये भरती होतात. मात्र, सुरक्षा आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्या पुढाकारामुळे, कायद्याचा बडगा आणि कल्याणकारी योजना यांच्या अंमलबजावणीमुळे आदिवासी तरुणांनी नक्षलवादी टोळ्यांकडून केल्या जाणाऱ्या भरतीकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. युवकांना शिक्षण आणि खेळांचा पर्याय उपलब्ध करून दिल्यास ते हिंसाचारापासून दूर राहतील, याबद्दलचा विश्वास सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासनामध्ये निर्माण झाला आहे.

**खेळाडू घडवण्यासाठी प्रोत्साहन**

बस्तर ऑलिंपिकच्या माध्यमातून तालुका पातळीपासून विभागीय पातळीपर्यंत विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. ऑलिंपिकचे उद्घाटन एक नोव्हेंबर रोजी होणार आहे. तालुका स्तरावरील स्पर्धा १ ते १५ या कालावधीत होणार असून १५ ते २० या कालावधीत जिल्हास्तरावरील स्पर्धा होणार आहे. विभागीय स्तरावरील अंतिम फेरीच्या क्रीडा स्पर्धा जगदलपूर येथे पार पडणार आहेत. विजेत्यांना रोख रक्कम आणि पदके देण्यात येणार आहे. या स्पर्धांमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना त्यांच्या आवडीच्या क्रीडा प्रकारात भवितव्य घडविण्यासाठी सर्व प्रकारची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे.

# विसर्जन मिरवणुकीसाठी रथांची तयारी अंतिम टप्प्यात




**पुणे :** दहा दिवसांपूर्वी वाजत गाजत मोठ्या जल्लोषात स्वागत करून प्राणप्रतिष्ठापना केलेल्या लाडक्या गणपती बाप्पाला उद्या निरोप देण्याची वेळ आली आहे. मंगळवारी अनंत चतुर्दशीला गणरायांना निरोप दिला जाणार आहे. विसर्जन मिरवणुकीसाठी रविवारी सायंकाळपासूनच आकर्षक रथ सजवण्याची लगबग सुरु झाली होती. मिरवणुकीची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे.

पुणे शहरातील गणेशोत्सव देशभरात प्रसिद्ध असून मंडई चौक आणि लक्ष्मी रोडवरील विसर्जन मिरवणुक पाहण्यास विविध भागातून हजारोच्या संख्येने भाविक येत असतात. गणेश विसर्जनालाही ढोल ताशे, मोठा उत्साह, जल्लोष आणि आकर्षक मिरवणूक पाहायला मिळते. विसर्जनाआधी लाखोंच्या संख्येने शहरासह उपनगर, ग्रामीण भागातून आलेल्या भाविकांनी गणरायाचे दर्शन घेतले. आलेल्या शनिवार- रविवारी देखावे पाहण्यासाठी नागरिकांनी एवढी गर्दी केली की त्याचा उच्चांकच झाला. सोमवारी.

# अखेर कोल्हापूर-पुणे वंदे भारत सुरु

**कोल्हापूर :** कोल्हापूर ते पुणे या दोन शहरांदरम्यान अनेक नागरिक प्रवास करत असतात. त्यामुळे या दोन शहरांदरम्यान एक्सप्रेस चालू व्हावी, अशी मागणी अनेक दिवसांपासून चालू होती. या मागणीप्रमाण गेल्या अनेक दिवसांपासून या मागणीचा पाठपुरावा चालू होता. त्यानुसार गेल्या अनेक दिवसांपासूनचे कोल्हापूरकरांचे स्वप्न वंदे भारत एक्स्प्रेसच्या माध्यमातून पूर्ण झालं आहे. कोल्हापूर-पुणे वंदे भारत आज १६ सप्टेंबरपासून सुरू झालीय. विशेष म्हणजे या एक्सप्रेसच्या माध्यमातून कोल्हापुरातून अवघ्या पाच तासांत पुणे ते कोल्हापूर असा प्रवास पूर्ण होणार आहे. नुकतीच या एक्सप्रेसची चाचणी करण्यात आली होती, त्यादरम्यान कोल्हापूर ते पुणे या मार्गावर वंदे भारत एक्सप्रेसला नक्की किती वेळ लागतो? तसेच रेल्वेवर जाताना इतर काही अडथळे येत आहेत का? या सगळ्याची चाचणी घेण्यात आली होती ही चाचणी यशस्वी झाल्यानंतर अखेर आजपासून म्हणजेच १६ सप्टेंबर पासून कोल्हापूरकर आणि पुणेकरांना सेवा देण्यात वंदे भारत सज्ज झालीय.

# सततच्या पावसाने सोयाबीनचे उत्पादन घटणार ; पिके पिवळी तर शेंगाच आल्या नाहीत



**पाचगणी :** सततच्या मुसळधार पावसाने सोयाबीन पिकाला जास्त पाणी झाले आहे. यामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. काही पाण्याच्या जमिनीत तर सोयाबीन उगवले पण ते गुडघाभर माजले पण त्याला शेंगाच आल्या नाहीत तर काही ठिकाणी फक्त काड्याच शिल्लक राहिल्या आहेत. बहुतांश सोयाबीन पिवळे पडले आहे यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

जावळी तालुक्यातील १५ ते २० हजार हजार हेक्टरच्या आसपास सोयाबीन पीक आहे. अलीकडच्या काळात बटाटा, भुईमूग ही पिके कमी होऊन याठिकाणी सोयाबीन चे प्रमाण वाढले आहे. दोन वर्षांपासून चांगले उत्पादन येऊनही दराने शेतकऱ्यांना मारले. काही वर्षे अतिवृष्टीने पिकाचे नुकसान झाले. काढणी वेळी येणाऱ्या अवकाळीने पीक हाताला लागले नाही. यंदाही अतिपावसाचा पिकाला फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

दिवाळीच्या तोंडावर सोयाबीन पीक शेतकऱ्यांचा हाती लागत असते. सोयाबीनची विक्री करून हा सण साजरे करण्याची पद्धत सुरू झाली आहे. परंतु, याच पिकातून समाधानकारक उत्पन्न हाती पडत नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अडचणीत जात आहे. यंदाचे चित्रही यापेक्षा वेगळे नसणार असे शेतकरीच आतापासून बोलत आहेत. मुळात सोयाबीनला आवश्यकतेपेक्षा अधिक पाणी लागले आहे. शेंगा लागण्याच्या कालावधीत उन्हाची गरज असताना अधून-मधून पावसाचा खेळ सुरू होता. यामुळे काही ठिकाणी शेंगा आल्याचं नाहित तर काही ठिकाणी एक दोन शेंगा आल्या आहेत. शेंगातील दाणे अपेक्षेनुसार धरतात की नाही, याची शंका व्यक्त होत आहे. काही शेतकऱ्यांच्या शेतात तर शेंगाचं आल्या नाहीत. नुसते पीक माजले आहे. त्यामुळे शेतकरी अडचनित आहेत.

मुख्य म्हणजे पाणी असणाऱ्या जमिनीतील सोयाबीन हाताला लागणार नाही, याची खात्रीच शेतकरी देत आहेत. अशा आणि काळ्या जमिनीतील सोयाबीनची सुरुवातीला उगवण चांगली झाली. परंतु, अतिरिक्त पाण्यामुळे आता ते पीक पिवळे पडले आहे आणि अती पावसाने त्याला उत्पादन अगदी २५ टक्केच मिळणार आहे.

जावळी तालुक्यातील नुकसान झालेल्या सोयाबीनचे पंचनामे झाल्याचे बोलले जात आहे . मात्र, रुईघर, काटवली, बेलोशी , दापवडी, कुडाळ, करहर, खर्शी, रामवाडी, हुमगाव , आलेवाडी, इंदवली, म्हस्वे, या भागात सोयाबीन मोठ्या प्रमाणात घेतले जाते परंतु अद्यापही या भागात कसलेच पंचनामे झाले नाहीत. मात्र, सोयाबीनचे नुकसान झाले आहे. उगवण झाली असली तरी त्यापासूनचे उत्पादन घटणार आहे. यामुळे शासनाने सोयाबीनची सरसकट पंचनामे करण्याची गरज या परिसरातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

घेवडा हातचा गेला आहे पावसाने उसंतच न दिल्याने घेवडा पूर्णपणे गेला आहे त्याचबरोबर भूईमुगालाही अतिरिक्त पाणी चालत नाही. उताराच्या ठिकाणी भुईमूग लावल्यास काही धोका नाही परंतु सपाटीच्या शेतीत मात्र लावलेला भूमीत जादा पाण्यामुळे पिवळा पडला आहे त्यालाही उत्पादन घटणार असल्याचे बोलले जात आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# दिलीप मोहिते पाटील यांना मंत्री पदाचा शब्द म्हणजे निव्वळ गाजर

## शिवसेना शिंदे गटाची टीका

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे दिलीप मोहिते पाटील यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेला मंत्रिपदाचा शब्द म्हणजे निव्वळ गाजर आहे. प्रत्यक्षात मोहिते पाटील हे विधानसभा निवडणूक लढविणार नाहीत, असे मत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष भगवान पोखरकर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. त्यावरून खेड आळंदी विधानसभा मतदारसंघात उमेदवारीवरून शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात खडाजंगी सुरू असल्याचे दिसून आले.

सन २०१९ मध्ये या पुढची विधानसभा निवडणूक लढविणार नसल्याचे सांगत दिलीप मोहिते पाटील यांनी मतदारांना भावनिक आवाहन केले होते. दिलीप मोहिते पाटील हे शब्द पाळणारे आमदार आहेत. त्यामुळे ही विधानसभा निवडणूक ते लढवणार नाहीत, अशा शब्दात पोखरकर यांनी मोहिते पाटील यांना उपरोधिक टोला लगावला.

दिलीप मोहिते पाटील ही निवडणूक लढवणार नाहीत कारण त्यांना पराभव समोर दिसतो आहे. ते निवडणूकच लढवणार नसल्यामुळे अजित पवार यांनी त्यांना दिलेला मंत्रीपदाचा शब्द म्हणजे केवळ दाखवलेले गाजर आहे, असा दावाही पोखरकर यांनी केला.

# संविधानाच्या लढ्यासाठी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाला सोबत घेणार : शरद पवार

**मुंबई :** संविधानाचा लढा मजबूत करण्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सोबत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाला सोबत घेण्यात येईल. अशी माहिती राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाने सादर केलेल्या एका अहवालाच्या पार्श्वभूमीवर दिली.

पक्षाचे अध्यक्ष नारायण बागडे यांनी सिल्वर ओक बंगल्यावर लोकसभा निवडणूक एक सविस्तर अहवाल शरद पवार यांना भेटून सादर केला त्यावेळी पवार बोलत होते. मागिल लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी आंबेडकरी रिपब्लीकन मोर्चाने



आंबेडकरी मतदानाचे विभाजन टाळून संविधानाच्या बाजूने उभे असलेल्यांना विजय प्राप्त करून कसा दिला याची सर्व विभागवार माहिती या अहवालात बागडे यांनी दिली आहे.

लोकसभेच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे मोठे नेते प्रतिगामी पक्षाच्या मांडीला मांडी लावून बसले होते तर काही पक्ष आघाडी मतदानाचे विभाजन करून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत होते. मात्र जेव्हा संविधानाचे अस्तित्व धोक्यात होते अशा वेळेस मोठी जबाबदारी आंबेडकरी रिपब्लिकन चळवळीच्या कार्यकर्त्यांवर आली होती. तेव्हा याच कार्यकर्त्यांनी प्रस्थापित नेत्यांचा घातकी हेतू नाकारून पुरोगामी परिवर्तनवादी पक्षाच्या बाजूने दंड थोपटले होते. हिच बाब या अहवालातून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी शरद पवार यांच्या निदर्शनास आणून दिली असता पवार यांनी याबाबत बागडे यांचे कौतुक केले. यावेळी शाम बागुल, प्रा.रमेश दुपारे, दिलीप कदम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# शालेय कुस्ती स्पर्धेत वेदांत निकमला सुवर्णपदक



**कोरेगाव :** सातारा जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने सातारा तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा नुकत्याच साताऱ्यातील छत्रपती शाहु स्टेडियम येथे पार पडल्या त्यात अरविंद गवळी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कॉलेजच्या वेदांत नंदकुमार निकम याने ६१ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले.

१२ वी सायन्सच्या वर्गात शिकणाऱ्या वेदांत निकमने प्रतिस्पर्ध्यावर मात करत सुवर्णपदक पटकावले. त्याची खंडाळा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वेदांत सध्या पोलीस क्रीडा प्रबोधनीमध्ये सराव करत असून त्याला प्रशिक्षक सागर भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले.

वेदांतच्या या यशाबद्दल माजी आमदार मदनदादा भोसले, ॲड्. जयवंतराव केंजळे, पै. बलभिम भोसले, चंद्रकांत इंगवले आदींनी अभिनंदन केले आहे. वेदांत हा किसनवीर कारखान्याचे माजी संचालक, सांगवी (ता.कोरेगांव) चे माजी सरपंच नंदकुमार निकम यांचा मुलगा आहे.

# मिरजेतील श्रीमंत महागणपती मंडळाची २१ फूट उंचीची फायबरची गणेशमूर्ती

**सांगली :** पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचणार नाही याची दक्षता घेत वारंवार मूर्ती तयार करण्यासाठीचा वेळ, खर्च वाचविण्यासाठी २१ फुटी फायबरची गणेशमूर्ती मिरजेतील श्रीमंत महागणपती मंडळाने यंदा साकारली आहे. ही मूर्ती २५ वर्षे टिकणार असून यानंतरही या मूर्तीत वापरण्यात आलेल्या साहित्याचा पुनर्वापर करण्याची योजना करण्यात आली



असल्याचे मंडळाचे अध्यक्ष अजिंक्य आमटे यांनी सांगितले.

मंडळाचे यंदाचे १७ वे वर्ष असून सर्वात उंच श्रींची मूर्ती बसविण्याची परंपरा मंडळाची आहे. या वर्षी २१ फुटी रेझीन फायबर यापासून श्रींची मूर्ती बनविण्यात आली असून तिचे आयुष्य किमान २५ वर्षे आहे. मूर्ती विसर्जन करून प्रदूषण वाढू नये यासाठी तिची जपणूक करून प्रतिवर्षी नव्याने रंगरंगोटी करून पुन्हा वापरण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. केवळ ढोल-ताशा या पारंपरिक वाद्यांचा वापर करून मिरवणूक काढून ही मूर्ती जतन केली जाणार आहे.

तसेच मंडळाच्या वतीने गणेशोत्सवामध्ये सामाजिक उपक्रम राबविण्यात आले असल्याचे मंडळाच्या उपाध्यक्षा ऐश्वर्या धुमाळ यांनी सांगितले. सद्य:स्थितीमध्ये महिलांना स्वसुरक्षा महत्त्वाची असल्याने या निमित्ताने महिलांनी स्वसंरक्षण कसे करावे, लहान मुलींना चांगला स्पर्श, वाईट स्पर्श याची माहिती देण्याबरोबरच लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. अवयवदानाबाबत जागृतीची मोहीम हाती घेण्यात आली असून मंडळाच्या २५ कार्यकर्त्यांनी अवयवदान करण्यास मान्यता दिली आहे. यावेळी मंडळाचे सदस्य अभिजित धुमाळ, सागर चौगुले, सुनील दिवाण, संकेत परचुरे, विनय जोशी आदी उपस्थित होते.

# कर्मवीर जयंतीनिमित्त शरद पवार २२ रोजी साताऱ्यात

**सातारा :** वंचित, गोरगरीब, दुर्गम भागातील, खेड्या पाड्यातील, बहुजनांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करणारे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती रविवार दि.२२ सप्टेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी,व्हा.चेअरमन ड.भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी होत असल्याची माहिती सचिव विकास देशमुख यांनी दिली.

दरवर्षी दि.२३ सप्टेंबर रोजी रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्र, कर्नाटक राज्यातील सर्व शाखा, सामाजिक संस्था कडून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सातारा येथील स्थानिक सर्व शाखांच्या वतीने कर्मवीर समाधी परिसर येथे जयंती साजरी होणार आहे. या दिवशी सकाळी ७:३० वा. कर्मवीर समाधीला अभिवादन, शहरातून चित्ररथासह रॅली, यावेळी शहरातील राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात येणार आहे.

सकाळी ९:३० वा. समाधी परिसरात अध्यक्ष शरद पवार यांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शाखा, विद्यार्थी, सेवकांचा सन्मान केला जाणार आहे. या कार्यक्रमाला सातारकरांना उपस्थित रहावे, असे आवाहन सचिव विकास देशमुख यांनी केले आहे.

# कु. श्रेया मासाळ यांची भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड

## सोनिया गोरेंनी केलं अभिनंदन

**वडूज :** खटाव तालुक्यातील पहिली लष्कर अधिकारी होण्याचा बहुमान मिळालेल्या वडूज येथील डॉ.हनुमंत मासाळ यांची कन्या कु.श्रेया यांची UPSC अंतर्गत घेण्यात आलेल्या ( CDS ) या परीक्षेच्या माध्यमातून भारतीय सेनेच्या लेफ्टनंट पदी निवड झाली असून कुमारी श्रेया मासाळ यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तुंग भरारी घेत भारतीय सेनेच्या लेफ्टनंट पदी विराजमान होण्याचा बहुमान मिळवला आहे. त्या बद्दल श्री सिद्धनाथ पतसंस्थेच्या संचालिका सौ. सोनिया जयकुमार गोरे यांनी लेफ्टनंट श्रेया यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अभिनंदन करून भारतीय लष्करामधील देशसेवेसाठी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी भारतीय जनता पार्टी खटाव तालुका महिला मोर्चा उपाध्यक्षा सौ.शितल अमोल गोडसे, नगरसेविका सौ.स्वप्नाली गणेश गोडसे, मा.नगरसेवक श्रीकांत (काका) बनसोडे मा. नगरसेवक अमोलशेठ गोडसे, गणेशशेठ गोडसे, मा नगरसेवक प्रदीप खुडे ,राकेश सोनटक्के, सोमनाथ सावंत व आदी मान्यवर उपस्थित होते.

# लिंगायत समाज, हिंदू धर्माचा अविभाज्य घटक : खासदार अजित गोपछडे

**सातारा :** लिंगायत समाज हा हिंदू धर्माचा अविभाजक घटक असून, काही संघटना काही लोक लिंगायत हा वेगळा धर्म असल्याचे सांगत आहेत, याबाबत लोकांच्या जनजागृती व्हावी यासाठी हिंदू वीरशैव लिंगायत समाजातर्फे वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्राचे आयोजन करण्यात आलेले आहे

आज काही मंडळी लिंगायत समाजाला हिंदू धर्मापासून दूर करण्याचा प्रयत्न करत आहेत. विरोधकांच्या या डावाला आम्ही बळी पडणार नाही. लिंगायत धर्म हा हिंदू धर्माचा अविभाज्य घटक आहे. संपूर्ण राज्यामध्ये एक ते सव्वा कोटी लिंगायत समाज आहे. लिंगायत समाजाच्या ५७ पोटजाती आहेत.

१९८२ साली समाजाचे २२ आमदार होते पण आज पाच आमदार आहेत. समाजातील व्यक्तींनी गटतट विसरून एकत्र येणे काळाची गरज असल्याचे मत खासदार तथा वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रेचे सर्वा डॉ. अजित गोपछडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

खा. गोपछडे राज्यातील म्हणाले, समाजाला एकत्र करणे, महात्मा बसवेश्वर यांचा समता व बंधुताचा संदेश सर्व समाजांना सांगणे यासाठी राज्यात वीरशैव लिंगायत समाज सन्मान यात्रा काढण्यात आली आहे. राज्यातील १६ जिल्ह्यातून ही यात्रा जात आहे. मंगळवेढा येथे यात्रेचा समारोप होणार आहे. याप्रसंगी जगतगुरु पासून सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. वीरशैव लिंगायत सन्मान यात्रेचे संपूर्ण राज्यात जोरदार स्वागत करण्यात आले. लिंगायत समाजाबरोबरच अन्य समाजाने यात्रेचे स्वागत केले आहे. समाजाच्या विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी तसेच समाजाला एकत्र करण्यासाठी यात्रा काढण्यात आल्याचे खा. गोपछडे यांनी सांगितले.

यावेळी श्री गुरुवर्य १०८ महादेव शिवाचार्य वाईकर महाराज, नितीनजी शेटे समन्वयक हिंदू वीरशैव लिंगायत यात्रा ,श्रावण जंगम अध्यक्ष राष्ट्रीय जंगम संघटना उपाध्यक्ष हिंदू वीरशैव लिंगायत मंच, सातारा लोकसभा संयोजक सुनीलतात्या काटकर, भाजपा सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी, कराड उत्तर मंडल अध्यक्ष शंकरराव शेजवळ,हिंदू वीरशैव लिंगायत मंच जिल्हासंयोजक सातारा आप्पासाहेब कोरे प्रा. राजेंद्र शेजवळ, महेंद्र बाजारे, विजय गाढवे ,निवास कांमळे, नंदू गुरसाळे, संजय पानसरे, रविंद्र मेनकर, बापू चौकवाले, दादा कळसकर, माधव मेंडिगिरी, राजेंद्र बारवडे, सुनीता साखरे, शारदा देवर्षि, इंदु कोरे चंदाताई जंगम, भाजपा जिल्हाचिटणीस दिपाली खोत, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राहुल शिवनामे, डॉक्टर उत्कर्ष रेपाळ, डॉक्टर सचिन भोसले, रवी आपटे, सोशल मीडिया जिल्हा प्रभारी रवी लाहोटी, सातारा शहर सरचिटणीस प्रवीण शहाणे, विक्रांत भोसले , सिने कामगार आघाडी अध्यक्ष विकास बनकर, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष

# जय महाराष्ट्र गणेश विकास मंडळाने राबवलेले उपक्रम कौतुकास्पद : महेंद्र जगताप

**उंडाळे :** येवती येथील जय महाराष्ट्र गणेश विकास मंडळाने गेल्या ३२ वर्षापासून एक गाव एक गणपती हा राबवलेला उपक्रम खरोखरच कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन कराडग्रामीणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप साहेब यांनी केले. जय महाराष्ट्र गणेश विकास मंडळ व लायन्स चॅरिटेबल आय हॉस्पिटल कराड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या मोफत मोतीबिंदू व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

यावेळी ते बोलताना म्हणाले की जय महाराष्ट्र गणेश मंडळाने या पुढे देखील अविरतपणे एक गाव एक गणपती ही परंपरा कायम ठेवावी आपल्या गावाला एक संघ ठेवावे असे आवाहन त्यांनी केले.

# झेडपीकडून सहा इलेक्ट्रीक घंटागाडीचे वितरण

**सातारा :** राज्य शासनाच्या पाणी व स्वच्छता विभागाकडून प्राप्त झालेल्या सहा इलेक्ट्रिक घंटागाडीचे वितरण जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. जिल्ह्यातील कुडाळ, लिंब, अतित, खेडसह सहा ग्रामपंचायतींना या गाड्या मिळाल्या आहेत. या इ-घंटागाड्यांमुळे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रियेस गती येणार आहे.

सातारा जिल्हा परिषदेसमोर मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या हस्ते गाड्यांचे वितरण झाले. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय लाड, सहायक प्रशासन अधिकारी सुनील रांजणे, कुडाळचे सरपंच वीरेंद्र शिंदे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे जिल्हा तज्ज्ञ रवींद्र सोनावणे आदी उपस्थित होते. राज्य शासनाने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राज्यस्तरावरून सहा ई-घंटागाड्या दिलेल्या आहेत. या वाहनांची मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी तांत्रिकदृष्ट्या पाहणी केली.

सातारा जिल्ह्यातील १ हजार ७४३ पैकी १ हजार ३०७ गावांमध्ये सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे पूर्ण झालेली आहेत.

# डॉ. अजित रानडेंना ‘अशा’ पद्धतीने हटवणे अत्यंत चुकीचे

## राज ठाकरेंची परखड भूमिका



**मुंबई :** पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरु पदावरुन डॉ. अजित रानडे यांना काढण्यात आल्यानंतर समाजातल्या विविध स्तरांमधून प्रतिक्रिया उमटत आहेत. रघुनाथ माशेलकर, भालचंद्र मुणगेकर यांनी या निर्णयावरुन टीका केली आहे. तसंच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सरकारचे कान टोचले आहेत.

गेले दोन दिवस वर्तमानपत्रामंध्ये पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरू पदावरून डॉ. अजित रानडे यांना अतिशय चुकीच्या पद्धतीने हटवल्याची बातमी वाचनात येत आहे. डॉ. अजित रानडेंसारख्या एका उच्चविद्याविभूषित, खासगी क्षेत्रात खूप मोठी कामगिरी केलेल्या व्यक्तीला, अशा पद्धतीने पदावरून हटवणं हे अत्यंत चुकीचं आहे. बरं, त्यासाठी रानडे यांना १० वर्षांचा अध्यापनाचा अनुभव नाही हे कारण पुढे केलं जात आहे. मग त्यांची नियुक्ती करताना, ही बाब लक्षात आली नव्हती का? अडीच वर्ष या पदावर राहून त्यांनी जी कामगिरी केली, त्यानंतर अचानक ही आठवण कशी होते ? अमेरिकेत किंवा पाश्चात्य देशांत, त्या त्या क्षेत्रातील अनुभवी माणसं पुढे अध्यापन क्षेत्रात येतात आणि शिक्षकाला त्या व्यवस्थांमध्ये प्रचंड मानसन्मान असतो. असं राज ठाकरे म्हणाले.

### अध्यापन अनुभव असे काहीतरी फुटकळ

यानंतर पोस्टमध्ये राज ठाकरे म्हणाले मी आत्ता अमेरिकेला गेलो असताना, तिथल्या अनेकांशी बोलताना, मला जाणवलं की अगदी नोबेल पुरस्कार विजेते, ते एखाद्या अवाढव्य उद्योग समूहात दीर्घकाळ उच्च पदावर काम केलेला माणूस पुढे विद्यापीठांमध्ये शिकवतो. एखाद्या विद्यापीठाचा प्रमुख होतो. तिथे त्या व्यक्तीची बुद्धिमत्ता, अनुभव, आणि त्या व्यक्तीची कार्यक्षमता हेच निकष बघितले जातात. ‘अध्यापन अनुभव’ असले काहीतरी फुटकळ निकष लावले जात नाहीत. मुळात आपल्याकडचं शिक्षण हे व्यवसाय उद्योगांना पूरक नसतं. याला दोन कारणं मला नेहमी जाणवतात की अभ्यासक्रम तयार करणारे, हे त्या क्षेत्रांत काम केलेले असतातच असं नाही, आणि शिकवणारे पण त्या क्षेत्रातील अनुभवी नसतात. त्यामुळे मुलांना जे शिकवलं जातं, ते पुढे त्यांना बाहेर पडल्यावर उपयोगी पडत नाही आणि त्यांची मग ओढाताण सुरु होते, बेरोजगारांच्या फौजा तयार होतात.

हे सरकारचं नवं शैक्षणिक धोरण आहे का?

या पुढे राज ठाकरे म्हणतात, हे सगळं असताना डॉ. अजित रानडेंसारखी व्यक्ती स्वेच्छेने शिक्षण क्षेत्रांत उतरते, आणि अशा व्यक्तीला पूर्णपणे नाउमेद करणारी कृती सरकारकडून घडणार असेल, तर या क्षेत्रांत पुन्हा कुठला तज्ज्ञ आणि धडपड्या माणूस येईल? आणि अशा पद्धतीने माणसांना अपमानित करून बाहेर काढणे हेच ‘नवं शैक्षणिक धोरण’ आहे का ?’ जरी हा विषय थेट राज्य सरकारच्या अखत्यारीत येत नसला तरी केंद्रातील सरकारकडे, राज्य सरकारने बोललं पाहिजे आणि यूजीसीने केलेली चूक सुधारलीच पाहिजे शिक्षण क्षेत्रांत फार मूलभूत काम करणं जर शक्य नसेल तर किमान अशा गोष्टींतून चुकीचे पायंडे पडतील आणि समाजातील बुद्धिमान लोकं नाऊमेद होणार नाहीत इतकं तरी सरकारने पहावं

गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजित रानडे यांची नियुक्ती रद्द केल्याचा निर्णय अत्यंत धक्कादायक, निराशाजनक, कालविसंगत आणि शिक्षण क्षेत्राला मागे घेऊन जाणारा असल्याचं स्पष्ट मत आर्थिक विषयातील, तसेच शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील दिग्गजांनी ‘लोकसत्ता’कडे व्यक्त केलं आहे.



**दौलतनगर -करंजे परिसरातील वाहतूक रस्त्याची दैन्यावस्था कायम..**

सातारा शहर परिसरातील छत्रपती शाहू क्रीडा संकुल पासून दौलतनगरचे भागात जाणाऱ्या तसेच या परिसरात असणाऱ्या शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींना तसे परिसरातील नागरिकांना अशा बिकट रस्त्याची समस्या कायमस्वरूपी भेडसावत आहे. पाऊस असो किंवा नसो या रस्त्यावरील पाण्याची टक्के अक्षरशा ये- जा करणाऱ्या नागरिकांना सचल स्नान घालत असतात. त्यातच या मार्गावरून दररोज हजारो विद्यार्थी ये-जा करत असताना हा रस्ता विकसित करण्याचा तसेच चांगला बनवण्याचा संकल्प पालिका प्रशासन का करत नाही ? असाच प्रश्न नागरिकांना पडत आहे .या परिसरातील चांदीचा मारुती चौक ते शानबाग विद्यालय रस्त्यावरची ही दुरावस्था आपल्या कॅमेरात टिपली आहे.

अतुल देशपांडे सातारा

# बाप्पा विसर्जन मिरवणुकीसाठी २ हजार १०० पोलिसांची फौज

**कोल्हापूर :** गणेश विसर्जन मिरवणूक निर्विघ्न पार पडावी यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे यामध्ये वरिष्ठ अधिका-यांसह २१०० पोलिसांची फौज रस्त्यांवर तैनात करण्यात आले आहे. मिरवणुकीवर नजर ठेवण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी सहा टेहळणी मनोरे तयार केले आहेत.

गेली अकरा दिवस गणरायाचे आगमन झाले असले तरी गणेश विसर्जन मिरवणूक निर्विघ्न पार पाडणे म्हणजे पोलिसांसाठी एक आव्हान असते. यामुळे मिरवणूक मार्गाची पाहणी, मंडळांना योग्य त्या सूचना देण्याचे काम पोलीस प्रशासनाच्या वतीने केले जात आहे. मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आल्या आहेत याशिवाय मिरवणूक मार्गावर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

असा असेल बंदोबस्त

अपर पोलिस अधीक्षक - १

उपअधीक्षक - ७

पोलिस निरीक्षक - २६

सपोनि, उपनिरीक्षक - १०३

अंमलदार - पुरुष - ६३४, महिला - १२९

### पारंपरिकसह पर्यायी मार्गाचीही तयारी

बाप्पांच्या विसर्जनासाठी महाद्वारमार्गे क्रशर खणीकडे जाणा-या पारंपरिक विसर्जन मार्गासह सुभाष रोड, हॉकी स्टेडियम, संभाजीनगरमार्गे क्रशर खणीकडे जाणा-या पर्यायी मार्गावरूनही मंडळांना विसर्जनासाठी जाता येणार आहे. महापालिका प्रशासन आणि पोलिसांनी दोन्ही मार्ग सज्ज ठेवले आहेत.

### २१०० पोलिसांची फौज

विसर्जन मिरवणुकीच्या बंदोबस्तासाठी पोलिसांसह राज्य राखीव दल, शीघ्र कृती दल, दंगल काबू पथक आणि होमगार्ड अशी सर्व दले सज्ज झाली आहेत. विसर्जन मार्गासह क्रशर खण आणि शहरातील प्रमुख मार्गांवर २१८९ पोलिस बंदोबस्तासाठी तैनात असतील.

### लेसरबंदीची काटेकोर अंमलबजावणी

डोळ्यांना घातक ठरणा-या लेसरवर विसर्जन मिरवणुकीत जिल्हाधिका-यांनी बंदी घातली आहे. या बंदी आदेशाचे काटेकोर पालन केले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. आदेशाचे उल्लंघन करणा-या मंडळांची लेसर यंत्रणा जप्त करून गुन्हे दाखल केले जाणार आहेत. त्यामुळे लेसरचा वापर कोणीही करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### उलट्या दिशेने प्रवेशाला बंदी

बिनखांबी गणेश मंदिर ते गंगावेश या मार्गावर सायंकाळी सहा ते रात्री बारापर्यंत प्रचंड गर्दी असते. नागरिकांना मिरवणूक व्यवस्थित पाहता यावी, यासाठी उलट्या दिशेने कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. जाणा-या आणि येणा-या नागरिकांसाठी दोन स्वतंत्र मार्ग केले जाणार आहेत. गर्दीच्या ठिकाणी बाहेर पडण्यासाठी व्यवस्था केली जाणार आहे. तसेच विसर्जन मार्गापासून १०० मीटर अंतरात वाहनांना प्रवेशबंदी असेल.

## क्राईम

### तडीपार आदेशाचे उल्लंघन; सहा जणांवर गुन्हा दाखल

**सातारा :** सातारा शहर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत सहा जणांवर सातारा तहसीलदारांनी गणेशोत्सवाच्या काळात शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी तडीपारीची कारवाई केली आहे. तरीही तेथे फिरताना आढळून आले. त्यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

हद्दपारीचे आदेश असतानाही विलास ऊर्फ यल्ला शरणाप्पा कुरमणी (वय २३, रा. बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा) हा सातारा येथे दि. १४ रोजी फिरताना आढळून आला. पोलीस हवालदार विक्रम माने यांनी कारवाई केली. कुरमणीवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस हवालदार शिंदे तपास करत आहेत.

महेश जालिंदर माने (वय ३८, रा. चंदननगर, कोडोली, ता. सातारा) याच्यावर तडीपारीची कारवाई असताना तो चंदननगरमध्ये फिरताना आढळून आला. त्याच्यावर पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्रनाथ माने यांनी कारवाई केली आहे. मानेवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस हवालदार सावी तपास करत आहेत. अक्षय बबन किर्तीकुडव (वय २९, रा. बौध्दवस्ती, कोडोली, ता. सातारा) हा सुध्दा गावामध्ये फिरताना पोलीस कॉन्स्टेबल सागर गायकवाड यांना आढळून आला. त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस हवालदार गुरव तपास करत आहेत.

रोहित प्रकाश जाधव (वय २४, रा. सुटकेस चौक, कोडोली, ता. सातारा) हा पोलीस कॉन्स्टेबल सुशांत कदम यांना कोडोलीत फिरताना आढळून आला. त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस हवालदार सूर्यवंशी तपास करत आहेत. शुभंकर बाळकृष्ण जाधव (वय २३, रा. महागाव, ता. सातारा) हा पोलीस कॉन्स्टेबल तुषार भोसले यांना महागावमध्ये फिरताना आढळून आला. त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस नाईक भोंडवे तपास करत आहेत.

प्रल्हाद शिवाजी पवार (वय २५, रा. गोपाळ वस्ती, अजंठा चौक, सातारा) याच्यावर तडीपारीची कारवाई सुरु असतानाही तो दि. १४ रोजी माहुली येथे फिरताना आढळून आला. त्याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई पोलीस कॉन्स्टेबल सचिन रिटे यांनी केली असून, तपास पोलीस हवालदार पोतेकर करत आहेत.

### बोरगाव पोलिसांची तीन जुगार अड्डयांवर कारवाई

**सातारा :** वर्णे, ता. सातारा येथे नारायण कुंडलिक पवार (वय ३२), राजेंद्र रामचंद्र कणसे (वय ५०), दादासो भिकू पवार (वय ५३), पांडुरंग किसन पवार (वय ४१), शिवाजी उत्तम सपकाळ (वय ५४, सर्व रा. वर्णे) हे जुगार खेळताना आढळून आले. दि. ८ रोजी पोलीस कॉन्स्टेबल केतन जाधव यांनी कारवाई केली असून, त्यांच्यावर बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### अल्पवनीय मुलीला पळवून नेले

**सातारा :** प्रतापसिंहनगरातील एका अल्पवयीन मुलीला अज्ञाताने फुस लावून पळवून नेले. ही घटना दि. १४ रोजी घडली. या प्रकरणी तिच्या आईने सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलीस नाईक तांबे तपास करत आहेत.

### पांगारे येथून युवत्ती बेपत्ता

**सातारा :** पांगारे, पो. बनघर, ता. सातारा येथून दि. १३ रोजी नंदिनी विठ्ठल पवार (वय २०) ही राहत्या घरातून कोणास काहीही न सांगता निघून गेली. याबाबत विठ्ठल रामचंद्र पवार (वय ४५, रा. पांगारे) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलीस हवालदार मंडले तपास करत आहेत.

### साबळेवाडीत अवैध दारुविक्रेत्यावर कारवाई

**सातारा :** साबळेवाडी, ता. सातारा येथील वेण्णानगर कॉलनीमध्ये अवैधरीत्या दारुविक्री केल्याप्रकरणी भीमराव प्रल्हाद साबळे (वय ५४, रा. साबळेवाडी) याच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई दि. १४ रोजी पोलीस उपनिरीक्षक देशमाने यांनी केली.

### भावा-बहिणींत मारहाण

**सातारा :** अंबवडे बुद्रुक, ता. सातारा येथे वडीलोपार्जित साहित्य उचलण्यास सांगितल्याच्या रागातून नणंद काजल संतोष जाधव (रा. अंबवडे बुद्रुक) हिने सुरज संतोष जाधव यांना मारहाण केली. हा प्रकार दि. ११ रोजी घडला. या प्रकरणी सुरज जाधव यांच्या पत्नी आरती जाधव यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलीस हवालदार येवले तपास करत आहेत.

### सातारा तालुक्यातून १२ इसम हद्दपार

**सातारा :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सातारा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून तालुक्यातील १२ जणांना १६ सप्टेंबर रोजी ००:०० ते १७ सप्टेंबर २४:०० या कालावधीत सातारा तालुका क्षेत्रात प्रतिबंधित मनाईचे आदेश तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सातारा नागेश गायकवाड यांनी दिले आहेत.सातारा तालुका हद्दीत सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण करु नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांना दणका दिला आहे. याबाबतचे प्रस्ताव कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला होता. तो मंजूर करण्यात आला आहे.

# अजित दादांनीच किसनवीर साखर कारखाना वाचवला

### दादांसारख्या नेतृत्वाची राज्याला गरज खा.नितीन पाटील



**वाई :** आम्हाला राज्यसभेत खासदार करा अशी मागणी आम्ही बंधूनी कधीच अजित दादांकडे केली नव्हती.उलट शेतकऱ्यांच्या मालकीचा किसनवीर साखर कारखाना वाचवा अशी आर्त मागणी आम्ही सातत्याने दादांकडे करीत होतो. दादांनी कारखान्याला ४६७ कोटी रुपयांची थकहमी कर्जाची मदत करून कारखाना वाचविला आहे. राजकारणात कितीही अन कशीही उलथापालथ झाली तरी राज्याला अजितदादांसारख्या सर्वसामान्यांचे हित जपणाऱ्या नेतृत्वाची गरज असल्याचे ठाम मत नवनिर्वाचित खासदार नितीन पाटील यांनी व्यक्त केले.

नितीन पाटील यांच्या खासदार निवडीनिमित्त खानापूर ग्रामस्थांनी आयोजित सत्कार सभारंभात पाटील बोलत होते.यावेळी आ.मकरंद पाटील,प्रतापराव पवार,महादेव मस्कर,दिलीपराव पिसाळ,अनिल सावंत,भैय्या डोंगरे, किरण जाधव आदी प्रमुख उपस्थित।होते.

खा. पाटील पुढे म्हणाले,अजित दादांकडे आ. मकरंद पाटील यांनी सततचा पाठपुराव्या केल्या मुळेच किसनवीर भुईंज आणि खंडाळा हे दोन्ही साखर कारखाने आपण वाचवु शकलो.गेले दोन हंगाम आपण कुठल्याही बँकेचे एक रुपया कर्ज न घेता यशस्वीरित्या चालविले आहेत .आपल्याला अजीत पवारांनी ४६७ कोटी रुपयांची आर्थिक मदत केल्यानेच आपण शेतकऱ्यांना उसबिले देऊ शकलो.अडचणीतील कारखाना ताब्यात घेऊन आबांनी राजकीय प्रतिष्ठा,अन राजकीय कारकीर्द पणाला लावली.शेतकऱ्यांची देणी दिली,अन कारखाना आर्थिक गर्तेतून बाहेर काढला तरच आमचे राजकारण टिकणार आहे याची जाणीवही आम्हाला होती.कारखाने वाचविण्यासाठी काही कटू निर्णय घ्यावे लागले,त्यागही करावा लागला.अजित दादांनी याची दखल घेतली.त्यांच्यासारख्या खमक्या नेतृत्वामुळे आपण शेतकऱ्यांचा मालकीचे कारखाने आपण वाचवू शकलो.

आ. मकरंद पाटील म्हणाले,आर्थिक गर्तेत सापडलेल्या किसनवीर साखर कारखान्यात सत्तांतर झाल्यानंतर शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्वास ठेऊन ३० कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करून दिले.त्यामुळे आम्ही कारखाना सुरू करू शकलो,अजित दादांमुळेच आपण ४६७ कोटी रुप्यांक्सचे८ कर्ज मिळवू शकलो.त्यामूळे कारखाना वाचविण्यात आपण यशस्वी झालो आहोत.नितीनची खासदारकी सातारा जिल्ह्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरेल.

यावेळी खानापूर ग्रामपंचायत ग्रामस्थ महिला विकास सोसायटी युवक आणि तरुण मंडळाच्या वतीने खासदार नितीन पाटील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.प्रास्तविक करून किरण काळोखे यांनी स्वागत केले तर जाधव यांनी आभार मानले. राजकारण करणे हे माझे काम नाही .स्व. तात्यांच्या पश्चात आमच्या कुटुंबातील मकरंद आबाने राजकारण करावे त्यांना मी आणि मिलिंददादाने मदत करायची असे ठरले होते. त्यामुळे कायमच आम्ही पडद्याआड राहून काम करत होतो.आजवर कधी भाषण केले नाही,अथवा स्टेजवर माईक हातात घेतला नाही.मी खासदार होईन असे मला स्वप्नातही वाटले नव्हते.असे नितीन पाटील यांनी नमूद केले.

# राहुल गांधीबाबत विरोधकांना धास्ती : आ. सतेज पाटील

### -आमदार गायकवाड यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध

कोल्हापूर : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देशभरात 'संविधान बचाव'चे वातावरण तयार केले आहे. त्याची धास्ती भाजप आणि मित्र पक्षांनी लोकसभेच्या वेळी घेतली, तशीच धास्ती विधानसभेलाही घेतली आहे. त्यामुळे काही वाचाळवीर खालच्या स्तरावर जाऊन राहुल गांधी यांच्या विरोधात वक्तव्ये करत आहेत. त्यांचा काँग्रेस पक्षाच्यावतीने आपण जाहीर निषेध करत असून येत्या निवडणुकीत जनताच महायुतीला याचे उत्तर देईल असा विश्वास विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी अजिंक्यतारा कार्यालय येथे पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.



वादग्रस्त वक्तव्यांमुळे नेहमी चर्चेत असलेले शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांचा आमदार सतेज पाटील यांनी समाचार घेतला. भाजपच्या पायाखालची वाळू सरकत चालली आहे. वाचाळवीरांच्या वक्तव्याला त्यांच्याच भाषेत आम्ही उत्तर देऊ शकतो, पण ती काँग्रेसची संस्कृती नाही. भाजपच्या ५ खासदारांनीच त्यांचे सरकार घटना बदलणार असल्याचे म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली ही घटना अबाधित राहिली पाहिजे ही भूमिका राहुल गांधींनी मांडली. याची सत्यता लोकानाही माहित आहे, असे पाटील यांनी सांगितले.

*महायुतीत प्रचंड वाद*

विधानसभा निवडणूक जागावाटपाबाबत बोलताना आमदार पाटील म्हणाले, महायुतीमध्ये जागावाटपावरून बरेच वाद आहेत. त्यांच्या रिक्षाचे नटबोल्ट, चाके निखळू लागली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात त्यांच्यात भांडणे आहेत. दुसरीकडे आमच्या महाविकास आघाडीत उत्तम समन्वय आहे. आमच्यात कोणतेही वाद नाहीत. बऱ्याच जागांवर एकमत झाले आहे. शंभरएक जागांवर चर्चा सुरु आहे. लोकसभेवेळी ४८ जागा आम्ही एकमताने लढवल्या होत्या, त्याच पद्धतीने एकमताने यावेळीही निवडणूक लढवू.

*तिसरी आघाडी कठीणच*

तिसऱ्या आघाडीच्या चर्चावरही त्यांनी भाष्य केले. जनतेसमोर महायुती आणि महाविकास आघाडी असे दोन पार्याय आहे. जनतेला राज्यात स्थिर सरकार हवे आहे. लहान पक्षांचा टेकू, ब्लकमेलिंग नको आहे, त्यामुळे जनता तिसरी आघाडी स्वीकारणे कठीण आहे. राज्यतील मतदार महाविकास आघाडीच्या बाजूनेच कौल देईल असा विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

# शालेय कुस्ती स्पर्धेत वेदांत निकमला सुवर्णपदक

**कोरेगाव :** सातारा जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने सातारा तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा नुकत्याच साताऱ्यातील छत्रपती शाहु स्टेडियम येथे पार पडल्या त्यात अरविंद गवळी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कॉलेजच्या वेदांत नंदकुमार निकम याने ६१ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले.

१२ वी सायन्सच्या वर्गात शिकणाऱ्या वेदांत निकमने प्रतिस्पर्ध्यावर मात करत सुवर्णपदक पटकावले. त्याची खंडाळा येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वेदांत सध्या पोलीस क्रीडा प्रबोधनीमध्ये सराव करत असून त्याला प्रशिक्षक सागर भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले.

वेदांतच्या या यशाबद्दल माजी आमदार मदनदादा भोसले, ॲड्. जयवंतराव केंजळे, पै. बलभिम भोसले, चंद्रकांत इंगवले आदींनी अभिनंदन केले आहे. वेदांत हा किसनवीर कारखान्याचे माजी संचालक, सांगवी (ता. कोरेगांव) चे माजी सरपंच नंदकुमार निकम यांचा मुलगा आहे.

# जिहे कठापूर योजनेद्वारे कोरेगाव तालुक्याचा दुष्काळ हटविणार

## आमदार महेश शिंदे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**सातारा :** कोरेगाव मतदारसंघातील सातारा तालुक्यातील वर्णे, निगडी, राजेवाडी, देगाव, कारंडवाडी आदी गावे सिंचनापासून वंचित होती. त्यांना कोणत्याही धरणातून पाणी दिले जात नव्हते. कोरेगाव मतदारसंघातील ७८ टक्के भागाला सिंचनाच्या पाण्याचा लाभ मिळत नव्हता. या मतदारसंघाचा आमदार झाल्यानंतर या गावांतील शेतीला पाणी देणे, हे प्रथम प्राधान्य राहिले आहे. त्यात यशस्वी झालो आहे. स्व. लक्ष्मणराव इनामदार जिहे कठापूर योजनेतून खटावचा दुष्काळ पूर्णपणे हटवला आहे. आज सर्वत्र पाणी फिरले आहे.

आता लक्ष कोरेगाव तालुक्याकडे आहे. अशी माहिती आमदार महेश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली .

येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले,बिचुकले, पळशी आदी गावांना सिंचनाखाली आणायचे आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेवून कोरेगाव मतदारसंघाला २ टीएमसी पाणी देण्याबाबतचा निर्णय घेतला होता. तो निर्णय २ ऑक्टोबर २०२३ ला कायम केला. ही योजना सत्यात आणणे शक्य झाले. त्यास निधी

सातारा जिल्ह्याने श्रीमंत छ. खा. उदयनराजे भोसले यांना विजयी केले. त्याचे बक्षीस म्हणून केंद्र सरकारने जिहे- कठापूर योजनेच समावेश पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत केला आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी जिहे-कठापूर योजनेच्या विस्तारित्र योजनेतील तासगाव (ता. सातारा) उपसा सिंचन योजनेला नुकतीच मान्यता दिली आहे. त्यामुळे वर्णे, निगडी, दाव, देवकरवाडी, कारंडवाडी, राजेवाडी गावातील सिंचनाचा प्रश्न सुटला आहे. या योजनेला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच शेतीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

तारळी धरणाचे पाणी २०१० पासून आतच 'कैद' होते. ते पाणी कॅनॉल काढून, अंडरग्राऊंड करुन लोकापर्यंत पोहोचवले आहे.

### जरांगे एका चळवळीचे मोठे नेते

**जरांगे पाटील हे माझ्याविरोधात कधीच 'फॅक्टर' उभे करतील, असे मला वाटत नाही. आम्ही सगळेच त्यांच्या भूमिकेशी काही अंशी सहमतही असतो. ते एका (मराठा) चळवळीचे मोठे नेते आहे. माझ्या सारख्या छोट्या कार्यकत्याबाबत ते काही करतील, असे वाटत नाही, असे स्पष्टीकरणही आ. शिंदे यांनी दिले.**

पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावल्याचेही आ. शिंदे यांनी सांगितले.

कोरेगाव मतदारसंघातील कोणती गावे शेतीच्या पाण्यापासून वंचित आहेत, त्याचा कोणी अभ्यास केला नव्हता. मात्र, महाराष्ट्र आणि कर्नाटक यातील पाणी लवादामुळे पाणी देता येत नाही, असा बागुलबुवा केला जात होता. पाणी मागणीच केली नाही. त्यांना शेतीच्या सिंचनासाठी पाणी देण्यात स्वारथ्य नव्हते, असा आरोप आ. महेश शिंदे यांनी आ. शशिकांत शिंदे यांच्यावर केला.

कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील गावांना पाण्याची मागणीही ते जलसंपदामंत्री असतानाही करु शकले नाही. जलसंपदामंत्री स्वत:च्या सहीने पाणी मंजूर करु शकतात. मी कृष्णा खोरेचा उपाध्यक्ष असून, छोटा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या माध्यमातून मी पाणी मंजूर करुन घेतले. त्यांच्या काळात शरद पवार केंद्रीय मंत्री होते. ते करु शकले असते. पण, त्यांचा अभ्यास कमी पडला.

आ. शशिकांत शिंदे गणेशोत्सवानंतर दंड थोपटणार आहेत, या प्रश्नावर खासदारकीच्या निकालादिवशीही त्यांनी दंड थोपटले होते, असा चिमटा आ. महेश शिंदे यांनी काढला.

आ. शिंदे यांनी आत्मपरिक्षण करावे. ते या मतदारसंघात आमदार होते. १६ महिने जलसंपदामंत्री होते. आम्ही जो विकास करतोय, तो विकास त्यांनाही करणे शक्य होते. कोरेगाव मतदारसंघातील कार्यकर्ते दबावाला बळी पडून काही करत नाहीत. माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांना त्यांच्या फलटण विधानसभा मतदारसंघाने त्यांना २५ हजारांचे मताधिक्य दिले. आ. शिंदे यांचे काम योग्य असते तर त्यांना खासदारकीला कोरेगाव संघात ७ हजार मतांनी पराभूत झाले नसते. त्यांचा जनाधार किती आहे, हे समजून येते. कोरेगाव मतदारसंघातील गुन्हेगारांवर कारवाई सुरु आहे. त्यांच्यावर गंभीर गुन्हे आहेत. बोगस तडीपारी कारवाई करण्याची धमक कोणत्याही अधिकाऱ्यात नसेल.

आ. शशिकांत शिंदे यांनी आत्मपरिक्षण केले पाहिजे. त्यांची राजकीय कारकिर्द समाजातील तरुणांना गुडगिरीकडे नेण्यात घालवली आहे. गुंडांची फॅक्टरी त्यांनी तयार केली. गुंडगिरी मोठ्या प्रमाणात बोकाळली. प्रतापसिंहनगरात अल्पवयीन मुलेचे पोट फाडले होते. तरीही पोलिसांनी गप्प बसायचे का? ते गोड बोलतात आणि गुंडांना सहकार्य करतात.

शशिकांत शिंदे मोठे गुन्हेगार आहेत. राज्य सरकारच्या जमिनीत त्यांनी प्रचंड मोठा अपहार केला आहे. ते आजही फरार आहेत. त्यांना जामीन मिळाला नाही. फरार गुन्हेगार पोलीस, प्रशासनाला नैतिकता दाखवतो आहे. प्रशासन अलर्ट झाले तर त्यांनाच कारागृहात जावे लागेल.आ. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना टीडीआर घोटाळा झाला. त्यावेळच्या राज्य सरकारने गंभीर कलमे आ. शशिकांत शिंदे यांच्यावर लावली आहेत. ते फरार गुन्हेगार आहेत. शेतकऱ्यांचे पैसे खावून फरार झालेले गुन्हेगार आहेत. त्यांनी प्रथम स्वत:च्या जामीनाचे बघावे. शेतकऱ्यांचे खालेले पैसे परत करावेत. ६७ गाळे परत दिले पाहिजेत.